**निशाणी क्र. ४५**
वर पुढे सुरु

पान क्रमांक १३

**<u>द्वितीय पक्षकाराकरीता द्वितीय पक्षकार साक्षीदार क्र. १ चा शपथेवर</u>**

**<u>अधिकचा सरतपास विधीज्ञ श्री. आर. पी. जाधव यांचेमार्फत</u>**

२८. मी दाखल केलेल्या शपथपत्रातील सर्व माहिती व मजकुर मी सांगितल्याप्रमाणे असून तो खरा व बरोबर आहे. सदरचा मजकुर मी वाचून त्यावर सही केली आहे.

दस्तऐवज यादी निशाणी क्रमांक ४७ वरील दस्तऐवज यादी सोबत दाखल दस्तऐवजांना **<u>निशाणी क्रमांक ४७ (१) ते ४७(२०६)</u>** देण्यात येते आहे. तसेच दस्तऐवज यादी निशाणी क्रमांक ३२ वरील दस्तऐवज यादीसोबत दाखल दस्तऐवजांना **<u>३२(१) ते ३२(२)</u>** देण्यात येत आहे.

**<u>प्रथम पक्षकार क्र. १ तर्फे द्वितीय पक्षकार साक्षीदाराचा शपथेवरील उलटतपास</u>**

**<u>विधीज्ञ श्री. मोहोळकर यांचेमार्फत सुरू.</u>**

२९. हे म्हणणे खरे नाही की, डिलावल कंपनीने मला नेमणूक पत्र/आदेश दिलेला नाही. डिलावल कंपनीने मला दिलेला नेमणूकपत्र/आदेश मी दाखल करु शकत नाही.

३०. मला माझा पगार रोख स्वरुपात मिळत होता. हे म्हणणे खरे आहे की, मला ईएसआय, पी.टी. व प्रॉव्हीडंट फंड लागू होता. हे म्हणणे खरे नाही की, ईएसआय, पी.टी. व प्रॉव्हीडंट फंडची कपात डिलावल कंपनीच्या खात्यातुन होत नसून ती कॉन्ट्रॅक्टरच्या खात्यातुन होत होती. ईएसआय चे खातेपत्रक व प्रॉव्हीडंट फंडचे पुस्तक मी दाखल करणार नाही. मला ईएसआय, पी.टी. व प्रॉव्हीडंट फंडचा कोड/नंबर आठवत नाही. मी तो पुढच्या तारखेला सांगू शकेल.

३१. मला पगारस्लीप मिळत होती. ती मी दाखल करु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, तासवडे येथील उत्पादन प्रक्रिया जून २००९ पासून बंद पडली आहे. मला माहित नाही की, डिलावल कंपनीने पाटणकर कॉन्ट्रॅक्टरसोबतचा करार फेब्रुवारी २००९ मध्ये रद्द केला आहे किंवा कसे.

३२. Tetrapack व SIDEL या कंपन्या पुण्यात आहेत. मी त्या कंपनीत गेलेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या कंपनीत काय उत्पन्न चालते हे मी प्रत्यक्षात सांगू शकत नाही. या दोन कंपन्यांमध्ये अंदाजे ४००० कामगार कार्यरत असतील. निश्चित संख्या मी सांगू शकत नाही. या कंपन्यांचे प्रॉफिट व लॉस स्टेटमेंट व बॅलन्स शीट मी प्रत्यक्षात पाहिलेली नाही. या कंपन्या कोणत्या देशातील आहेत हे मी सांगू शकत नाही. Tetralaval group board कोठे बसतो मला माहित नाही. Tetrapack, SIDEL, Tetralaval व Dilaval या कंपन्यांचे Board of Directors कोण कोण आहेत हे मला माहित नाही. मला माहित नाही की, डिलावल कंपनीने बोर्ड ऑफ डायरेक्टर सन २००९ पासून अस्तित्वात आहे किंवा नाही. या बोर्डाचा अध्यक्ष कोण आहे हे मला माहीत नाही.

३३. मला आत माझ्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. ४(१) दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, या परिच्छेदमधील मजकूर शाबित करण्याकरीता माझ्या शब्दाशिवाय इतर पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, हा मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे आहे की, डिलावल कंपनी तासवडे व्यतिरिक्त आजून कोठेही नाही. Tetrapack व SIDEL या कंपन्याचे मस्टर रोल व सॅलरी रजिस्टर मी पाहिलेले नाही. Tetralaval याचे मुख्य कार्यालय व फॅक्टरी कोठे आहे हे मला माहित नाही. या कंपनीच्या मुख्य कार्यालयात मी गेलोलो नाही.

**<u>प्रथम पक्षकार वकिलांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.</u>**

समक्ष / श्रवणोत्तर स्वीकृत
वा.दा.व.अ.क.के

ठिकाण – सातारा.
दिनांक –२१/११/२०२५

( निखिल अ. गुप्ता )
न्यायाधीश,
कामगार न्यायालय, सातारा.